
ePaper

## देश संकटात! मोंथा चक्रीवादळ किनाऱ्यावर... 3700 गावांना हाय अलर्ट जारी

| वर्ष - 9 | अंक -65 | UDYAM-MH-26-0158827 |





महाईन्यूज ™

### आतील पानांत


- सुजीत कलकलची सुवर्णपदकावर मोहोर
- 'पॉवरप्ले'मध्ये बुमराची भूमिका निर्णायक!
- मोंथा चक्रीवादळाची तीव्रता वाढली
- सागरी सुरक्षेसमोरील आव्हाने ओळखावीत!


www.mahaenews.com | बुधवार, दि. 29 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### धंगेकरांचा गेम, मोहोळांवर नेम! शिंदेंकडून 'हिशोब चुकते'ची राजकीय चाल

# जैन बोर्डिंग डील रद्द!

## पुण्यात शिंदेसेनेचा राजकीय डाव यशस्वी; केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ अडचणीत

| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**खासदारकीच्या पहिल्याच टप्प्यात मंत्रीपद मिळवलेल्या मुरलीधर मोहोळ यांच्यावर जैन बोर्डिंग विषयावरून शिंदेसेनेचे रविंद्र धंगेकर यांनी सरळ हल्ला चढवला. सोशल मीडियावर दररोज नवे आरोप करत त्यांनी प्रकरणाला तोंडपातळीवर आणलं. या हल्ल्यांमुळे मोहोळ राजकीयदृष्ट्या बचावात्मक स्थितीत आले. धंगेकर हे स्वतः आमदार नसले तरी शिंदेसेनेचे पुणे महानगरप्रमुख म्हणून त्यांची भूमिका अधिक प्रभावी ठरली. त्यांच्या या आक्रमक भूमिकेमागे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मूक पाठिंबा असल्याचं बोललं जातं. राजकीय वर्तुळात चर्चा अशी की, "शिंदेंच्या आशीर्वादाशिवाय धंगेकर इतकं धाडस करू शकत नाहीत."**



### शिंदेंचा 'डॅमेज' डाव

गुंड निलेश घायवळ प्रकरणात शिंदेसेनेने भाजपचे मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर आरोपांची झोड उठवली होती. त्या वेळी पाटील यांनी एकट्याने ती खिंड लढवली, मात्र भाजपने त्यांना फारसा आधार दिला नाही. तो डाव अपुरा राहिला.

मात्र, जैन बोर्डिंग प्रकरणात शिंदेसेनेला दुसरी संधी मिळाली — आणि ती त्यांनी साधली. रविंद्र धंगेकरांनी यावेळी आक्रमक रणनीती आखली आणि केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांना लक्ष्य करत शिंदेंनी भाजपला राजकीय 'शह' दिला.

### "साधा पदाधिकारी" विरुद्ध "केंद्रीय मंत्री"

या प्रकरणातील सर्वात लक्षवेधी बाब म्हणजे – एक साधा पदाधिकारी असलेला धंगेकर यांनी भाजपच्या केंद्रीय मंत्र्याला राजकीयदृष्ट्या नाकीनऊ आणले. सोशल मीडियावरील पोस्ट, स्थानिक बैठका आणि पत्रकार परिषदांच्या माध्यमातून त्यांनी मोहोळ यांच्यावर दररोज आरोप केले.

या आक्रमक मोहिमेचा परिणाम असा झाला की, अमित शहा मुंबईत येण्याआधीच हे प्रकरण थांबवावे लागले. दिल्लीपर्यंत चर्चेचा विषय बनलेल्या या प्रकरणावर पडदा टाकण्यासाठी जैन बोर्डिंग डील रद्द करण्यात आलं.

### टायमिंगवरून राजकीय हलचल

या आरोपांचे टायमिंगही राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे ठरले. कारण आगामी पुणे महापालिका निवडणूक दारात आली आहे. महापालिकेच्या उमेदवारी वितरणात मोहोळ यांचा मोठा प्रभाव आहे. अशा वेळी त्यांच्यावर झालेले आरोप म्हणजे भाजपच्या स्थानिक नेतृत्वाला दिलेला मोठा इशारा.

भाजपमधील काही जण मोहोळ यांच्या बचावासाठी पुढे सरसावले, पण धंगेकर यांना हवा तसा परिणाम साधता आला. भाजपला पुण्यात अस्वस्थ करण्याचा शिंदेसेनेचा डाव यशस्वी ठरला.

### ठाण्याचा हिशोब पुण्यात चुकता?

या सगळ्या घडामोडींमागे शिंदेसेनेची 'राजकीय हिशोबाची' रणनीती असल्याचे बोलले जाते. ठाण्यात भाजप नेते गणेश नाईक यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करत त्यांचा उल्लेख "भूखंड चोर, पाणी चोर" असा केला होता.

आता त्याचाच "उट्टा" पुण्यात काढण्यात आला — म्हणजेच भाजपच्या मंत्र्याला लक्ष्य करून ठाण्यातला हिशोब चुकता केला. "तुमचे नेते आमच्या सर्वोच्च नेत्यावर बोलत असतील, तर आम्हीही तुमच्या नेत्यांना सोडणार नाही," असा स्पष्ट राजकीय संदेश शिंदेंनी या कारवाईतून दिल्याचं बोललं जात आहे.

### अमित शहांचा दौरा आणि पडद्यामागचं राजकारण

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा मुंबईत भाजपच्या नवीन कार्यालयाच्या भूमिपूजनासाठी आले. पण त्याआधीच पुण्यात जैन बोर्डिंग प्रकरणाचा शेवट करण्यात आला. सूत्रांच्या माहितीनुसार, दिल्लीहून काही संकेत मिळाल्यानंतर हे प्रकरण शांत करण्यात आलं. मात्र, शिंदेंनी उद्दिष्ट साधलं होतं — मोहोळ यांना राजकीयदृष्ट्या कमजोर करणे आणि पुण्यात भाजपचा तळ हलवणे.

### भाजपचा "आश्वासक चेहरा" डॅमेज

लोकसभा निवडणुकीनंतर भाजपला राज्यात केवळ ९ जागा मिळाल्या. त्यामुळे पक्षाने मराठा समाजातील प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी मोहोळ यांना केंद्रीय राज्यमंत्रीपदाची संधी दिली. अमित शहा यांच्या सहकार खात्याचा राज्यमंत्री म्हणून त्यांना स्थान मिळालं. मोहोळ हे भाजपचे "आश्वासक आणि स्वच्छ प्रतिमेचे" नेते म्हणून ओळखले जातात. पण जैन बोर्डिंग प्रकरणाने त्यांच्या प्रतिमेवर प्रश्नचिन्ह उभं केलं. शिंदेसेनेने हे प्रकरण जाणीवपूर्वक उचलून त्यांना डॅमेज करण्याचा प्रयत्न केला, असा राजकीय विश्लेषकांचा दावा आहे.

### भविष्यातील नेतृत्व अडचणीत?

भाजपच्या भविष्यातील नेतृत्वात मुरलीधर मोहोळ यांचे नाव भावी मुख्यमंत्रीपदाच्या चर्चेत घेतले जात होते. मराठा समाजाचा स्वीकार आणि पुण्यातील लोकप्रियता यामुळे ते संभाव्य मराठा चेहरा ठरू शकले असते.

मात्र, जैन बोर्डिंग प्रकरणामुळे त्यांच्या प्रतिमेला धक्का बसल्याने त्यांचे राजकीय समीकरण बिघडले आहे. एकनाथ शिंदेंनी मराठा चेहऱ्यालाच मराठा चेहऱ्याने रोखले, अशी व्याख्या आता राजकीय पंडित करत आहेत.

### शिंदेंचा 'हिशोब चुकते' संदेश

या संपूर्ण प्रकरणाचा सारांश काढायचा झाला, तर शिंदेंनी भाजपला अप्रत्यक्षपणे "हिशोब चुकते" करण्याचा संदेश दिला आहे. ठाण्यात आमच्यावर टीका करणाऱ्यांना आम्हीही सोडणार नाही — आणि गरज पडल्यास तुमच्या नेत्यांनाही राजकीयदृष्ट्या अडचणीत आणू, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे.

## राजकीय पंडितांच्या मते

जैन बोर्डिंग प्रकरण जरी अधिकृतरीत्या संपल्याचे दिसत असले, तरी त्याच्या राजकीय लाटा अजून बराच काळ उसळत राहणार आहेत. शिंदेसेनेचा पुण्यातला डाव भाजपला अस्वस्थ करणारा ठरला आहे, आणि मोहोळ यांच्यासाठी ही नवी राजकीय परीक्षा ठरली आहे. "शिंदेंनी मोहोळांवर नेम साधला आणि खेळ पुण्यात खेळला, पण लक्ष्य मात्र ठाण्यातलं होतं."

फडणवीस यांचा आदेश | साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती

# व्हीएसआय’च्या अनुदानाची चौकशी

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार हे अध्यक्ष असलेल्या आणि राज्याचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री अजित पवार हे विश्वस्त असलेल्या वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटला (व्हीएसआय) देण्यात आलेल्या अनुदानाच्या रकमेचा विनियोग कसा करण्यात आला, याची चौकशी करण्याचा आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील मंत्री समितीने दिला आहे. त्यासाठी साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.**

## ‘व्हीएसआय’च्या अनुदानाची चौकशी



संस्थेच्या अध्यक्षपदी शरद पवार असून, विश्वस्त मंडळावर उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी मंत्री दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, हर्षवर्धन पाटील आदी नेते असल्याने चौकशीच्या या निर्णयाची राजकीय चर्चा सुरू झाली आहे. राज्यातील आगामी ऊस गाळप हंगामाच्या नियोजनासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्री समितीची बैठक सोमवारी झाली. त्यामध्ये ‘व्हीएसआय’ला दिल्या जाणाऱ्या अनुदानाच्या मुद्द्यावर चर्चा झाली. अनुदानाचा आणि ‘व्हीएसआय’ला मिळणाऱ्या निधीचा संशोधन आणि विकासाच्या उद्देशाने विनियोग केला जात आहे का, याबाबत शंका उपस्थित करण्यात आली. त्यामुळे अनुदानाच्या रकमेची चौकशी करण्याचा निर्णय घेण्यात आला.राज्याचे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती असणार आहे. त्याबाबतचा आदेश साखर आयुक्तांना देण्यात आला आहे. पुढील दोन महिन्यांत ‘व्हीएसआय’ला देण्यात आलेल्या अनुदानाची चौकशी समितीकडून केली जाणार असून त्यानंतर अहवाल राज्य शासनाला दिला जाणार आहे.दरम्यान, ‘व्हीएसआय’ ही ऊस शेती आणि उत्पादनांवर संशोधन करणारी संस्था आहे. ऊसउत्पादकांच्या उसाच्या देयकातून प्रतिटन एक रुपया या संस्थेला राज्य शासनाच्या आदेशानुसार दिला जातो. तसेच सन २००९ पासून विविध स्वरूपाची अनुदाने या संस्थेला राज्य शासनाकडून दिली जात आहेत. राज्य शासनाकडून ‘व्हीएसआय’ला अनुदान दिले जाते. या अनुदानाचा विनियोग योग्य पद्धतीने होत आहे की नाही, याची माहिती घेतली जाणार आहे. ‘व्हीएसआय’कडून त्याबाबतचा अहवाल नियमित स्वरूपात दिला जातो. मात्र, मंत्री समितीच्या आदेशानुसार येत्या काही दिवसांत चौकशी पूर्ण केली जाईल. संस्थेच्या अध्यक्षपदी शरद पवार असून, विश्वस्त मंडळावर उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी मंत्री दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, हर्षवर्धन पाटील आदी नेते असल्याने चौकशीच्या या निर्णयाची राजकीय चर्चा सुरू झाली आहे. राज्यातील आगामी ऊस गाळप हंगामाच्या नियोजनासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्री समितीची बैठक सोमवारी झाली. त्यामध्ये ‘व्हीएसआय’ला दिल्या जाणाऱ्या अनुदानाच्या मुद्द्यावर चर्चा झाली. अनुदानाचा आणि ‘व्हीएसआय’ला मिळणाऱ्या निधीचा संशोधन आणि विकासाच्या उद्देशाने विनियोग केला जात आहे का, याबाबत शंका उपस्थित करण्यात आली. त्यामुळे अनुदानाच्या रकमेची चौकशी करण्याचा निर्णय घेण्यात आला.राज्याचे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती असणार आहे. त्याबाबतचा आदेश साखर आयुक्तांना देण्यात आला आहे. पुढील दोन महिन्यांत ‘व्हीएसआय’ला देण्यात आलेल्या अनुदानाची चौकशी समितीकडून केली जाणार असून त्यानंतर अहवाल राज्य शासनाला दिला जाणार आहे. ऊसउत्पादकांच्या उसाच्या देयकातून प्रतिटन एक रुपया या संस्थेला राज्य शासनाच्या आदेशानुसार दिला जातोया संस्थेला राज्य शासनाकडून दिली.

## काही दिवसांत चौकशी पूर्ण केली

या अनुदानाचा विनियोग योग्य पद्धतीने होत आहे की नाही, याची माहिती घेतली जाणार आहे. ‘व्हीएसआय’कडून त्याबाबतचा अहवाल नियमित स्वरूपात दिला जातो. येत्या काही दिवसांत चौकशी पूर्ण केली जाईल. ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार हे अध्यक्ष असलेल्या आणि राज्याचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री अजित पवार हे विश्वस्त असलेल्या वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटलादेण्यात आलेल्या अनुदानाच्या रकमेचा विनियोग कसा करण्यात आला

# शाळांची संचमान्यता दुरुस्ती होणार नाही!

## यू-डायस प्लस प्रणालीच्या एकत्रिकरणाचा निर्णय घेण्यात आला

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिक्षण विभागाअंतर्गत सरल प्रणाली, यू-डायस प्लस प्रणालीच्या एकत्रिकरणाचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, राज्य सरकारच्या निर्णयानुसार अनुदानास पात्र ठरवलेल्या शाळांबाबत ‘स्कूल पोर्टल’ आणि ‘स्टुडंट पोर्टल’वर बदल करण्याचे निर्देश देण्यात आले असून, या बदलाबाबतची कार्यवाही मुदतीत पूर्ण न केल्यास संबंधित शाळांच्या संचमान्यता दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येणार नाही.**



माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी या बाबतचे निर्देश राज्यभरातील विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षकांना परिपत्रकाद्वारे दिले आहेत. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली ३० मे रोजी झालेल्या राज्यस्तरीय आढावा बैठकीत सरल प्रणाली, यू-डायस प्लस प्रणालीचे एकत्रिकरणाबाबत निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने देण्यात आलेल्या निर्देशांनुसार सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून ऑनलाइन प्रणालीमध्ये यू-डायस प्लस प्रणालीवरील माहितीच्या आधारे संच मान्यता करण्याची कार्यवाही सुरू आहे, असे नमूद करण्यात आले आहे.शासनाच्या १४ ऑक्टोबर रोजीच्या निर्देशांनुसार २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात २० ऑक्टोबर रोजी यू-डायस प्लस प्रणालीवर नोंद असलेल्या विद्यार्थ्यांच्या माहितीच्या आधारे संचमान्यता करताना २५ ऑगस्ट रोजीच्या निर्णयानुसार अनुदानास पात्र ठरलेल्या शाळांच्या व्यवस्थापनामध्ये ‘स्कूल पोर्टल’ आणि ‘स्टुडंट पोर्टल’वर व्यवस्थापन बदल करणे आवश्यक आहे.

## एकत्रिकरणाबाबत निर्णय

ही प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्यास संबंधित शाळांच्या सन २०२५-२६च्या संचमान्यता दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी या बाबतचे निर्देश राज्यभरातील विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षकांना परिपत्रकाद्वारे दिले आहेत. विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली ३० मे रोजी झालेल्या राज्यस्तरीय आढावा बैठकीत सरल प्रणाली, यू-डायस प्लस प्रणालीचे एकत्रिकरणाबाबत निर्णय घेण्यात आला.

निवडणुकीची तयारी: आयुक्त श्रावण हर्डीकर यांचे आदेश

# शहरातील अनधिकृत फ्लेक्सवर होणार कारवाई

## निवडणूक कामकाजासाठी नियुक्त नोडल अधिकाऱ्यांची बैठक

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील अनधिकृत फ्लेक्सवर तात्काळ कारवाई करा. यासाठी गरज पडल्यास पोलिसांची मदत घ्या. शहरात अनधिकृत फ्लेक्स आढळल्यास ते तात्काळ हटवावेत, असे निर्देश आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिले. सर्व प्रभाग स्तरावर क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी यासाठी स्वतंत्र पथक नेमावे आणि त्या माध्यमातून कारवाई करण्याची मोहीम सातत्याने राबवावी, अशा स्पष्ट सूचना आयुक्त हर्डीकर यांनी दिल्या आहेत.**

महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने नोडल अधिकाऱ्यांची विविध कामकाजासाठी नेमणूक करण्यात आली आहे. या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी आज महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात आयुक्त हर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. आयुक्त हर्डीकर हे दृकश्राव्य माध्यमातून बैठकीत सहभागी झाले होते. निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी बैठकीच्या सुरुवातीला निवडणूक कामकाजाबाबत सविस्तर माहिती दिली.

अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन, मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, नगर सचिव मुकेश कोळप, सह शहर अभियंता बापू गायकवाड, अनिल भालसाखळे, मनोज सेठिया, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे, डॉ. प्रदीप ठेंगल, राजेश आगळे, सीताराम बहुरे, प्रदीप खोत, निलेश भदाणे, पंकज पाटील, सहाय्यक आयुक्त राजू घुले, उमेश ढाकणे, किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी अमित पंडित, अजिंक्य येळे, सहाय्यक संचालक नगररचना प्रशांत शिंपी, विशेष अधिकारी किरण गायकवाड, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह निवडणूक कामकाजात सहभागी अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

### निवडणूक कामकाजासाठी तरतूद

निवडणूक कामकाज प्रशिक्षण, मतदान केंद्र, ईव्हीएम व्यवस्थापन, वाहन अधिग्रहण, जनसंपर्क व प्रसिद्धी, स्विप व्यवस्थापन, निवडणूक खर्च व्यवस्थापन, न्याय व विधी कक्ष, संगणकीय कामकाज आदी निवडणूक कामकाजासंबंधी सर्व बाबींचा आयुक्त हर्डीकर यांनी आढावा घेऊन आवश्यक तरतूद ठेवण्याच्या सूचना दिल्या.

### जबाबदारी वेळेत आणि चोखपणे पार पाडा

मतदार प्रक्रियेच्या अनुषंगाने तात्काळ करावयाच्या उपाययोजना व कार्यवाही याबाबत संबंधित नोडल अधिकाऱ्यांनी सूक्ष्म नियोजन करून सोपवलेली जबाबदारी विहित वेळेत चोखपणे पार पाडावी, अशा सूचना आयुक्त हर्डीकर यांनी दिल्या.

# घरोघरी जाऊन होणार मतदारांच्या नावांची पडताळणी

## पिंपरी चिंचवडमध्ये प्रभागनिहाय मतदार याद्या फोडण्याच्या कामाला वेग

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**मतदार याद्या फोडण्याचे काम वेगात सुरू आहे. या कामासाठी नेमलेले १ हजार ८०० अधिकारी व कर्मचारी कामात व्यस्त आहेत. प्रत्यक्ष प्रभागात जाऊन सीमेवरील घरांना भेट देऊन मतदारांची नावांची पडताळणी केली जात आहे.**

महापालिकेचे चार सदस्यीय एकूण ३२ प्रभाग आहेत. ही प्रभागरचना ६ ऑक्टोबर रोजी अंतिम होऊन प्रसिद्ध करण्यात आली आहे. तीन प्रभाग फोडून शेजारच्या प्रभागात तो परिसर जोडण्यात आला आहे. त्यामुळे मतदार संख्येत मोठा बदल झाला आहे. एका प्रभागातील ७ ते ८ हजार मतदार दुसऱ्या प्रभागात समाविष्ट झाले आहेत. त्यामुळे एससी व एसटीच्या जागेतील आरक्षणात बदल झाला आहे. परिणामी, अनेक इच्छुकांसह माजी नगरसेवकांसमोर पेच निर्माण झाला आहे. त्या विरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे माजी शहरप्रमुख अॅड. सचिन भोसले हे उच्च न्यायालयात गेले आहेत. न्यायालयाच्या निर्णयाकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

दुसरीकडे, महापालिकेच्या निवडणुकीसाठी प्रभागनिहाय मतदार यादी फोडण्याचे प्रत्यक्ष काम शनिवारी (दि.१८) सुरू झाले आहे. त्या कामकाजासाठी प्रगणक, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) व पर्यवेक्षक असे एकूण १ हजार ८०० अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या सर्वांना मतदार यादी फोडण्याचे प्रशिक्षण १७ ऑक्टोबर रोजी देण्यात आले. त्यासाठी विधानसभा मतदारसंघाची १ जुलै २०२५ रोजीची अंतिम मतदार यादी गृहित धरण्यात आली आहे. शहरात पिंपरी, चिंचवड, भोसरी तसेच, भोर या चार विधानसभा मतदार संघातील मतदार आहेत. मतदार याद्या महापालिकेला प्राप्त झाल्या असून प्रभागनिहाय मतदार याद्यांचे विभाजन करण्यास सुरुवात झाली आहे.

सर्व कर्मचारी हे महापालिकेचे आहेत. त्यांना प्रशिक्षणही देण्यात आले आहे. मुदतीमध्ये काम पूर्ण करण्याच्या सूचना त्यांना देण्यात आल्या आहेत, असे महापालिकेच्या निवडणूक मतदान कक्षाचे सहायक आयुक्त तथा सहायक प्राधिकृत अधिकारी किरणकुमार मोरे यांनी सांगितले. स्वतंत्र संगणक प्रणालीचा वापर प्रभागनिहाय ३२ प्रभागाची प्रारूप मतदार यादी ५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यासाठी स्वतंत्र संगणक प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. त्यानंतर ६ नोव्हेंबर रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करून १४ नोव्हेंबरपर्यंत हरकती व सूचना स्वीकारण्यात येणार आहेत.

### प्रगणक, बीएलओंना प्रभागातील भाग यादीची जबाबदारी

प्रत्येक प्रगणक व बीएलओंना प्रभागातील मतदान केंद्रातील एका भाग यादीची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यानुसार, ते काम करीत आहेत. त्या भागात समाविष्ट असलेल्या घराची पाहण्ीही केली जात आहे. तसेच, प्रभागातील सीमेवरील भागांतील मतदारांची बारकाईने तपासणी केली जात आहे. एका प्रभागाचा मतदार दुसऱ्या प्रभागात समाविष्ट होऊ नये, यासाठी खबरदारी घेण्यात येत आहे. दिलेल्या मुदतीमध्ये काम पूर्ण न केल्यास कारवाई करण्यात येणार आहे.




**महाराष्ट्रात चार हजार बंधारे कोरडे पडले आहेत. नद्याही कोरड्या पडल्या आहेत. जलाशयातील पाण्याची पातळी झपाट्याने खालावत आहे. सर्वाधिक प्रभावित प्रदेशांमध्ये मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि पुणे विभागाचा समावेश आहे. महाराष्ट्र आणि पंजाबसारख्या राज्यांमध्ये ऊसासारखी पाण्याची जास्त गरज असलेली पिके घेतली जातात. भारतातील जलसंकटाकडे सरकार आणि राजकीय पक्षांनी गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.**

# पाणीटंचाईचे संकट; धोक्याचा इशारा!



जगातील एकूण लोकसंख्येपैकी १७ टक्के लोक भारतात राहतात; पण जगातील फक्त चार टक्के गोड्या पाण्याचे स्रोत येथे आहेत. देशाच्या १४० कोटी लोकसंख्येपैकी ३५ कोटी लोकांना पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध नाही. कर्नाटकची राजधानी असलेल्या बंगळुरूमध्ये गेल्या महिनाभरापासून पाण्याचे संकट जाणवत आहे. तिथे आता टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. एका अहवालानुसार येथील १४,७०० पैकी ६०९९७ कूपनलिका कोरड्या पडल्या आहेत. बंगळुरूच्या दीड कोटी लोकांना दररोज किमान दोन अब्ज लिटर पाण्याची आवश्यकता असते. त्यापैकी सत्तर टक्क्यांपेक्षा जास्त पाणी कावेरी नदीतून येते. कावेरी खोऱ्याच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस कमी झाल्यामुळे बंगळुरूला पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. सध्या बंगळुरूचे मुख्य जलाशय असलेल्या केआरएस धरणात त्याच्या क्षमतेच्या २८ टक्क्यांपेक्षा पाणी कमी आहे. एकेकाळी हिरव्यागार असलेल्या या भागात आता आयटी पार्क आणि उंच इमारती बांधल्यामुळे जमिनीत पाणी मुरण्याची क्षमता खूपच कमी झाली आहे. स्वच्छतेसाठी पुरेसे पाणी मिळत नसल्याने त्यांचे आरोग्यही धोक्यात आले आहे. टँकरमधून पाणी भरण्यासाठी लोक लांबच लांब रांगा लावताना दिसत आहेत. 'नीती'आयोगाच्या अहवालानुसार कोट्यवधी लोक तीव्र पाणीटंचाईचा सामना करत असून अनिश्चित मान्सूनमुळे पाणीटंचाईची समस्याही गंभीर होत आहे. महाराष्ट्रात चार हजार बंधारे कोरडे पडले आहेत. नद्याही कोरड्या पडल्या आहेत. जलाशयातील पाण्याची पातळी झपाट्याने खालावत आहे. सर्वाधिक प्रभावित प्रदेशांमध्ये मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि पुणे विभागाचा समावेश आहे. महाराष्ट्र आणि पंजाबसारख्या राज्यांमध्ये ऊसासारखी पाण्याची जास्त गरज असलेली पिके घेतली जातात. देशातील २२ टक्के ऊस एकट्या महाराष्ट्रात पिकतो. पंजाबमधील भातशेतीच्या सिंचनासाठी वापरण्यात येणारे ऐंशी टक्के पाणी भूजल स्रोतांमधून येते. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश आणि पंजाब या औद्योगिक राज्यांमध्येही पाण्याची पातळी दहा वर्षांच्या सरासरीपेक्षा कमी आहे. पाण्याची अशी टंचाई असतानाही केंद्र सरकार पाण्याचा जास्त वापर करणारी पिके परदेशात निर्यात करून पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय करत आहे. म्हणजे एखादे पीक पिकवण्यासाठी जेवढे पाणी वापरले जाते, तेवढेच पाणी निर्यातीच्या माध्यमातून देशाबाहेर जाते. देशात पाणीटंचाई कायम राहिल्यास उद्योग आणि शहरीकरणावरही त्याचा परिणाम होईल. त्यामुळे भारताचे आर्थिक महासत्ता बनण्याचे स्वप्न साकार होण्यास अडथळे येऊ शकतात. भारतातील जलसंकटाकडे सरकार आणि राजकीय पक्षांनी गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. कारण पाणी हा जीवनाचा आधार आहे. पाणी हा राष्ट्रीय सुरक्षेलाही धोका आहे पण या मुद्द्यावर राजकीय पक्षांमध्ये इच्छाशक्तीचा अभाव असल्याचे दिसून येते. पाण्याच्या कमतरतेमुळे लोकांच्या आरोग्यावर, शेतीवर आणि अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होऊ शकतो. प्राप्त परिस्थितीत लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत राजकीय पक्षाच्या जाहीरनाम्यांमध्ये मात्र सध्या गंभीर होत असलेल्या पाणीप्रश्नाकडे लक्ष दिलेले नाही. देशातील जलसंकटाला तोंड देण्यासाठी राजकीय पक्षांना आपल्या जाहीरनाम्यात अनेक घोषणा करता आल्या असत्या. नवीन जलाशय म्हणजेच धरणे बांधणे, पावसाचे पाणी साठवून त्याचा योग्य वापर करणे, कमी पाण्यात होणाऱ्या शेतीचे तंत्र विकसित करणे, प्रदुषित पाणी स्वच्छ करून त्याचा पुनर्वापर करणे, पाण्याचा अपव्यय थांबविण्यासाठी काही निर्णय घेणे या अशा काही महत्त्वाच्या गोष्टींचा समावेश करून त्याकडे गांभीर्याने लक्ष दिल्यास भविष्यात जलसंकटाला तोंड देणे सोपे होऊ शकते.

## प्रासंगिक »

### कुबडी'माझी सांडली

***अमित शहा यांच्या मुंबईतील विधानात काहीही गैर म्हणता येणार नाही. त्यामुळे त्या विधानावर कुणाच्या सारवासारवीचीही गरज नाही....***

धडधाकट, स्वत:च्या पायावर उभी असलेली, धावू शकणारी व्यक्ती कधी कुबडीस बरे वाटावे म्हणून "चला... आज कुबडी घेऊन चालू या" असे म्हणेल काय? कुबडी ही शारीरिक गरज की मानसिक? कुबडीचा आधार आणि उभे राहण्यासाठी वा अन्य शारीरिक कार्यासाठी कोणाचे सहकार्य यात मूलत: फरक काय? कुबडी आणि पांगुळगाडा हे दोन समानार्थी शब्द काय दर्शवतात? कोणतेही अपंगत्व नसतानाही बाह्य साधनांचा आधार बालवयात घेतला जाण्याची शक्यता असते. लहानगी मुले उभी राहू शकत नाहीत तोवर त्यांच्यासाठी पांगुळगाडा वापरण्याची पद्धत आहेदोन्हींचे कार्य तेच. पण उद्देश आणि गरज वेगळी. शिवाय यांतील आणखी एक मूलभूत फरक म्हणजे पायांत जोर आल्यावर, बालक उभे राहू शकते आहे हे कळू लागल्यावर पांगुळगाडा दूर केला जातो आणि बऱ्याच घरांत पुढील अपत्यासाठी माळ्यावर रवाना होतो.

विधानसभेची निवडणूक येत्या काही महिन्यांत अपेक्षित असलेल्या पश्चिम बंगालमध्ये केंद्रातील भाजप आणि राज्यातील सत्ताधारी तृणमूल काँग्रेसमध्ये कायमच जुंपलेली असते. हे वाद थांबणार नाहीत, हे उघड असताना सर्वोच्च न्यायालयाच्या एका निकालाने सत्ताधारी तृणमूल काँग्रेसला दिलासा मिळाला

# निधी रोखण्याच्या मुजोरीला वेसण

'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना' म्हणजेच मनरेगा या योजनेत पश्चिम बंगालमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार झाल्याचा ठपका ठेवून केंद्र सरकारने पश्चिम बंगालचा निधी मार्च २०२२ पासून रोखून धरला होता. याविरोधात काही स्वयंसेवी संघटनांनी पश्चिम बंगाल उच्च न्यायालयात आव्हान दिले असता जून महिन्यात न्यायालयाने योजनेत काही गैरप्रकार झाले असले तरी संपूर्ण राज्याचा निधी रोखणे योग्य नाही, असे निरीक्षण नोंदवून १ ऑगस्टपासून निधी पुन्हा सुरू करण्याचा आदेश दिला. त्या आदेशाविरोधात केंद्र सरकार सर्वोच्च न्यायालयात गेले. मात्र सर्वोच्च न्यायालयाने कोलकाता उच्च न्यायालयाचा निकाल वैध धरून केंद्र सरकारची याचिका नुकतीच फेटाळून लावली. त्यामुळे आता केंद्र सरकारला पश्चिम बंगालमध्ये मनरेगा योजनेसाठी निधी द्यावा लागणार आहे.हा निकाल सत्ताधारी तृणमूल काँग्रेससाठी



राजकीयदृष्ट्या फायदेशीरच ठरणारा आहे. 'निवडणुकीत तृणमूलचा पराभव करू शकत नसल्याने आर्थिक वा अन्य मार्गाने कोंडी करण्याचा प्रयत्न झाला. भाजपला योग्य प्रत्युत्तर मिळाले आहे', अशी प्रतिक्रिया ममता बॅनर्जी यांचे भाचे आणि तृणमूलमधील क्रमांक दोनचे नेते अभिषेक बॅनर्जी यांनी व्यक्त केली आहे.

यातून तृणमूल हा मुद्दा प्रचारात हिरिरीने मांडणार हे निश्चित. पण प्रश्न केवळ राजकारणाचा नाही. तो केंद्र-राज्य आर्थिक संबंधांचाही आहे.ग्रामीण भागातील कुटुंबीयांना वर्षात १०० दिवसांच्या रोजगाराची हमी देण्यासाठी काँग्रेसप्रणीत यूपीए सरकारच्या काळात २००५ मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजना कायदा करण्यात आला. या योजनेसाठी केंद्राकडून राज्यांना निधी दिला जातो. लोकसभेच्या २०१९ च्या निवडणुकीतील यशानंतर २०२१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीत भाजपच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. पण ममता बॅनर्जी यांना विक्रमी संख्याबळ मिळाले.त्यानंतर मनरेगामध्ये काही गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार झाल्याचे-उदाहरणार्थ, मृत मजुरांनाही दोन ते नऊ हजारांच्या रकमा दिल्या गेल्याचे माहितीच्या अधिकारातून उघड झाले होते. त्याचा आधार घेत केंद्राने लगेच मार्च २०२२ पासून या योजनेचा निधी रोखला आणि सीबीआय, ईडी आदी यंत्रणांमार्फत चौकशी सुरू केली. मग 'पश्चिम बंगालमध्ये तब्बल २५ लाख जॉबकार्डे बनावट असल्याचा ईडीचा कयास' अशाही बातम्या विशेषत: २०२४ च्या लोकसभा निवडणुकीआधीच्या महिन्याभरात काही प्रसारमाध्यमे देऊ लागली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## गतिमान निवडणूक — पवार गटाकडे २१ जणांची उमेदवारीची मागणी

# इस्लामपूर पालिकेसाठी हालचाली!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**इस्लामपूर नगरपालिका निवडणुकीसाठी राजकीय हालचाली गतिमान झाल्या असून, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडे पहिल्याच दिवशी २१ जणांनी उमेदवारी मागणीचे अर्ज घेतले. पक्षाचे प्रभारी अशोक खोत, भास्कर कदम, प्रा. दत्तात्रय पाटील यांनी इच्छुकांना उमेदवारी अर्जाचे वाटप केले.**

## निवडणुकीसाठी हालचाली गतिमान



इस्लामपूर हा आमदार जयंत पाटील यांचा गड मानला जातो. मात्र, सात वर्षांपूर्वी झालेल्या थेट नगराध्यक्ष निवडीमध्ये भाजपचे निशिकांत भोसले-पाटील यांनी विकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक जिंकली होती.

आताही नगरपालिका निवडणुकीत आमदार पाटील यांची कोंडी करण्याच्या हालचाली गतिमान झाल्या आहेत. नुकतीच याबाबत आमदार सदाभाऊ खोत, विक्रम पाटील, सम्राट महाडिक, राहुल महाडिक, निशिकांत भोसले-पाटील आणि अन्य नेत्यांची प्राथमिक बैठकही झाली आहे. एकसंघपणे निवडणूक लढविण्याबाबत चर्चाही झाली आहे.निवडणुकीसाठी इच्छुकांच्या मुलाखती ३० ऑक्टोबरपर्यंत माजी मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष शिवाजीराव नाईक घेणार असून, त्याचा अहवाल जिल्हाध्यक्षांकडे व प्रदेश कार्यालयाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती अशोक खोत व भास्कर कदम यांनी दिली.दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने इच्छुकांना उमेदवारी मागणी अर्ज देण्यास सुरुवात केली. पहिल्याच दिवशी विक्रमी २१ अर्ज इच्छुकांनी घेतले. यामध्ये एकूण १५ प्रभागांसाठी रियाज मुबारक पटेल, आरती अमोल खोत, विश्वास यशवंत साळुंखे, विद्या शिवाजी पवार, अजित विजयराव पाटील, संजना संजय तेवरे, रेखा मुकुंद रासकर, रुक्साना फारुख इबूशे, फिरोज हारुण पटेल, अक्षय विजयराव कोळेकर, रुपाली अभिजित पाटील, अक्षय हणमंत पाटील, भास्कर केरबा कदम, अनुजा स्वप्नील देशमुख-कोरे, संदीप सुनील वायदंडे, सदानंद दिनकर कुंभार, सलीम कच्छी, महेश परांजपे, स्नेहा बाबासाहेब जाधव, अमर बनसोडे, जयकुमार कांबळे आदी इच्छुक उमेदवारांनी पहिल्या दिवशी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीकडून निवडणूक लढण्यासाठी अर्ज घेतले.इच्छुक उमेदवारांचे सामाजिक, राजकीय, सहकार, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रातील कामकाज पाहिले जाणार आहे. निवडणुकीसाठी इच्छुकांच्या मुलाखती ३० ऑक्टोबरपर्यंत माजी मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष शिवाजीराव नाईक घेणार असून, त्याचा अहवाल जिल्हाध्यक्षांकडे व प्रदेश कार्यालयाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती अशोक खोत व भास्कर कदम यांनी दिली. इस्लामपूर हा आमदार जयंत पाटील यांचा गड मानला जातो. मात्र, सात वर्षांपूर्वी झालेल्या थेट नगराध्यक्ष निवडीमध्ये भाजपचे निशिकांत भोसले-पाटील यांनी विकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक जिंकली होती. इस्लामपूर हा आमदार जयंत पाटील यांचा गड मानला जातो. मात्र, सात वर्षांपूर्वी झालेल्या थेट नगराध्यक्ष निवडीमध्ये भाजपचे निशिकांत भोसले-पाटील यांनी विकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक जिंकली होती. आताही नगरपालिका निवडणुकीत आमदार पाटील यांची कोंडी करण्याच्या हालचाली गतिमान झाल्या आहेतआहे. निवडणुकीसाठी इच्छुकांच्या मुलाखती ३० ऑक्टोबरपर्यंत माजी मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष शिवाजीराव नाईक घेणार असून, त्याचा अहवाल जिल्हाध्यक्षांकडे व प्रदेश कार्यालयाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती अशोक खोत व भास्कर कदम यांनी दिली.

### एकसंघपणे लढविण्याबाबत चर्चा

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने इच्छुकांना उमेदवारी मागणी अर्ज देण्यास सुरुवात केली,संदीप सुनील वायदंडे, सदानंद दिनकर कुंभार, सलीम कच्छी, महेश परांजपे, स्नेहा बाबासाहेब जाधव, अमर बनसोडे, जयकुमार कांबळे आदी इच्छुक उमेदवारांनी पहिल्या दिवशी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीकडून निवडणूक लढण्यासाठी अर्ज घेतले.इच्छुक उमेदवारांचे सामाजिक, राजकीय, सहकार, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रातील कामकाज पाहिले जाणार आहे.

# 'लाडकी बहीण 'चा खर्च ४३ हजार कोटींवर

## लाडकी बहीण राज्यातील दुसऱ्या क्रमांकाची महागडी योजना

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**'माझी लाडकी बहीण योजना' राज्याच्या वार्षिक अर्थसंकल्पातील सर्वात मोठ्या खर्चांपैकी एक योजना ठरली आहे. पहिल्याच वर्षात या योजनेचा एकूण खर्च ४३ हजार कोटींवर गेला आहे. माहिती अधिकारातून ही बाब समोर आली आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला जुलै २०२४ पासून सुरूवात झाली. या योजनेअंतर्गत महिलांना दरमहा १५०० रुपये देण्यात येतात.**




या योजनेचा पहिला हप्ता ऑगस्टमध्ये लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात जमा करण्यात आला होता.'द यंग व्हिसल ब्लोअर्स फाउंडेशन' चे सामाजिक कार्यकर्ता जितेंद्र घाड़गे यांनी माहिती अधिकारात या योजनेबाबत माहिती मिळवली आहे. त्यानुसार एप्रिल २०२५ मध्ये सर्वाधिक म्हणजे २ कोटी ४८ लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळाला. जून २०२५ पर्यंत लाभार्थी आणि वितरित रकमेची संख्या सुमारे ९ टक्क्यांनी घटली. त्यामुळे सुमारे ३४ कोटी रुपयांची बचत झाली. जुलै २०२४ ते जून २०२५ या काळात एकूण ४३ हजार ४५ लाख कोटी इतकी रक्कम वितरित करण्यात आली. मागील विधानसभा निवडणुकीच्या आधी ऑक्टोबर २०२४ मध्ये सर्वाधिक म्हणजे ७ हजार ४१९ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला. लाभार्थ्यांची संख्या २ कोटी ४८ लाख एवढी कायम राहिली तर वार्षिक खर्च ४४ हजार ६४० कोटी पर्यंत पोहोचू शकतो. हा खर्च मंजूर अंदाजापेक्षा सुमारे ८ हजार कोटींने जास्त आहे.या योजनेसाठी पहिल्या वर्षी झालेला ४३ हजार ४५ लाख कोटींचा वर्ष २०२४-२५ च्या सुधारित अंदाज ३३ हजार ४३३ कोटीं पेक्षा जास्त आहे. या अर्थसंकल्पातील २०२५-२६ च्या प्रमुख विभागांच्या तुलनेत लाडकी बहिण योजना खर्चाच्या दृष्टीने शिक्षण विभागानंतर दुसऱ्या क्रमांकावर आली आहे. शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृती (१ लाख ६ हजार ३३८ कोटी) , महिला बालकल्याण विभाग- लाडकी बहिण योजना ( ४३ हजार ४५ लाख कोटी), शेती व संबंधित उपक्रम ( ४० हजार ७४८ कोटी), रस्ते व पूल- परिवहन ( ४० हजार ७४८ कोटी), पोलीस विभागआदी खर्च विविध विभागात करण्यात येत आहे.हप्ता ऑगस्टमध्ये लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात जमा करण्यात आला होता.'द यंग व्हिसल ब्लोअर्स फाउंडेशन' चे सामाजिक कार्यकर्ता जितेंद्र घाड़गे यांनी माहिती अधिकारात या योजनेबाबत माहिती मिळवली

### ३४ कोटी रुपयांची बचत झाली

सर्वाधिक म्हणजे २ कोटी ४८ लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळाला. जून २०२५ पर्यंत लाभार्थी आणि वितरित रकमेची संख्या सुमारे ९ टक्क्यांनी घटली. त्यामुळे सुमारे ३४ कोटी रुपयांची बचत झाली. जुलै २०२४ ते जून २०२५ या काळात एकूण ४३ हजार ४५ लाख कोटी इतकी रक्कम वितरित करण्यात आली.

संकटकाळासाठी तयारी

## ४ तासांत आंध्र प्रदेशची किनारपट्टी ओलांडणार

# मोंथा चक्रीवादळाची तीव्रता वाढली

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्याचं रूपांतर चक्रीवादळात झालं आहे. त्यामुळे चक्रीवादळ आलं असून या चक्रीवादळाला मोंथा असं नाव देण्यात आलं आहे. हे मोंथा चक्रीवादळ मंगळवारी रात्री आंध्र प्रदेशच्या किनाऱ्याजवळ येऊन धडकलं आहे. हे वादळ आता आंध्र प्रदेशातून पुढे जाण्यासाठी तीन ते चार तास लागणार आहेत.**

## महाराष्ट्रावर परिणाम होणार का?



आंध्र प्रदेशातील काकीनाडाजवळ चक्रीवादळ धडकणार असल्यामुळे स्थानिक प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी तेथील शेकडो लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवलं आहे. तसेच या चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर आंध्र प्रदेश आणि ओडिशा राज्यात अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. ताशी ११० किमी वेगाने वारे वाहत असल्याने सोमवारपासूनच किनारपट्टीवर मुसळधार पाऊस आणि वादळी वारे वाहत आहेत.मोंथा हे गेल्या सहा तासांत १७ किमी प्रति तास एवढ्या वेगाने वायव्येकडे सरकलं आणि ते मछलीपट्टनम (आंध्र प्रदेश) पासून तब्बल १२० किमी पूर्वेला काकीनाडा (आंध्र प्रदेश) पासून ११० किमी दक्षिणेस, विशाखापट्टणम (आंध्र प्रदेश) पासून २२० किमी नैऋत्येला आणि गोपाळपूर (ओडिशा) पासून ४६० किमी नैऋत्येला स्थित आहे, असं भारतीय हवामानशास्त्र विभागाने म्हटलं आहे.पुढील तीन ते चार तासांत मोंथा चक्रीवादळउत्तर-वायव्येकडे सरकत राहील. दरम्यान, मोंथा चक्रीवादळाचा तेलंगणा, तामिळनाडू, झारखंड आणि पश्चिम बंगालच्या काही भागात परिणाम जाणवण्याची शक्यता आहे. तसेच या राज्यांत पुढील काही दिवस मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आलेला आहे.आंध्र प्रदेश सरकारने चक्रीवादळग्रस्त सात जिल्ह्यांमध्ये कृष्णा, एलुरु, पूर्व गोदावरी, पश्चिम गोदावरी, काकीनाडासह आणखी काही भागात बुधवारी रात्री ८:३० ते सकाळी ६ वाजेपर्यंत वाहनांची वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्याची घोषणा केली आहे. तसेच रात्रीच्या संचारबंदीतून फक्त आपत्कालीन वैद्यकीय सेवांनाच सूट देण्यात आली आहे. अधिकाऱ्यांनी रहिवाशांना घरातच राहण्याचं, अनावश्यक प्रवास टाळण्याचं आणि अधिकृत सुरक्षा सूचनांचं पालन करण्याचं आवाहन केलं आहे. जिल्हाधिकाऱ्यांना आणि पोलीस अधीक्षकांना या जिल्ह्यांमधून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गांसह सर्व रस्ते वाहतूक बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आंध्र प्रदेश मोंथा चक्रीवादळाचा सामना करण्यासाठी सज्ज झाले आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार ते मंगळवारी दुपारी ते मछलीपट्टणमपासून १०० किमी आणि विशाखापट्टणमपासून २७० किलोमीटर अंतरावर पोहोचले होते. चक्रीवादळ किनाऱ्याला धडकल्यानंतर वाऱ्याचा वेग ९० ते ११० किलोमीटर प्रतितास इतका राहील, असा अंदाज आहे. दरम्यान, किनाऱ्यावरील एका गावात झाड उन्मळून पडलेल्या घटनेत एका महिलेचा मृत्यू झाला. चक्रीवादळ धडकण्यापूर्वी किनारी भागात पाऊस पडण्यास सुरुवात झाली आहे. मछलीपट्टणम येथे मंगळवारी दुपारपर्यंत ५.२ मिमी पावसाची नोंद झाली. नरसापूर येथे ९.८ मिमी, काकीनाडा येथे ५.७ मिमी पाऊस झाला. नेल्लोर जिल्ह्यात सोमवारपासून पाऊस पडत आहे. दरम्यान, मोंथा चक्रीवादळामुळे ३१ ऑक्टोबरपर्यंत पश्चिम बंगालसह किनारी भागात जोरदार पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. दक्षिण आणि पूर्व राजस्थानमध्येही मंगळवारी जोरदार पाऊस झाला. झारखंड आणि तमिळनाडूतही जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. विशाखापट्टणम विमानतळावरून जाणारी आणि येणारी अशी एकूण ३२ विमाने मंगळवारी रद्द करण्यात आली. विमानतळाचे संचालक एन. पुरुषोत्तम यांनी ही माहिती दिली. चक्रीवादळाच्या काळातील आवश्यक सर्व नियमावलींचे पालन करण्यात येत असल्याचे ते म्हणाले.तिरुपती विमानतळावरून चार उड्डाणे रद्द करण्यात आली. दक्षिण-मध्य रेल्वेने वादळाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी आणि मंगळवारी एकूण १२० रेल्वे रद्द केल्या.

### रेल्वे, विमानसेवेला फटका

आंध्र प्रदेशच्या नेल्लोर जिल्ह्यात १९ छावण्यांची उभारणी, ७०० लोक छावण्यांमध्ये दाखल – ओडिशामध्ये दोन हजार संकट निवारण केंद्रांची स्थापना, ११,३९६ नागरिक २०४८ केंद्रांमध्ये दाखल- एनडीआरएफची १० पथके आंध्र प्रदेशात, सहा पथके ओडिशात, तमिळनाडू आणि तेलंगणमध्ये प्रत्येकी तीन पथके, छत्तीसगडमध्ये दोन आणि पुदुच्चेरी येथे एक पथक तैनात – ओडिशात एसडीआरएफची ३० पथके, अग्निशामक दलाची १२३ हून अधिक पथके तैनात.

# सागरी सुरक्षेसमोरील आव्हाने ओळखावीत!

## 28 ते 30 ऑक्टोबरदरम्यान नौदलाच्या वतीने परिषदेचे आयोजन

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आताच्या बदलत्या काळात आणि गुंतागुंतीची आव्हाने पाहता सागरी सुरक्षेकडे केवळे धोक्यांना प्रतिबंध करण्याच्या संकुचित दृष्टिकोनातून पाहून चालणार नाही," असे वक्तव्य नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी सोमवारी केले. उलट, गतिमान आणि गुंतागुंतीचे आव्हान म्हणून त्याकडे पाहायला हवे, असे ते म्हणाले.**

हिंद-प्रशांत प्रादेशिक संवाद-२०२५'मध्ये ते बोलत होते. माणेकशॉं केंद्रामध्ये २८ ते ३० ऑक्टोबरदरम्यान नौदलाच्या वतीने परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. नौदलातील विविध अधिकारी आणि विविध देशांतील या क्षेत्रांतील तज्ज्ञांनी परिषदेत सहभाग घेतला आहे.

ॲडमिरल त्रिपाठी म्हणाले, "मानवजातीच्या इतिहासात सागरी मार्ग हे सर्वांत जुने महामार्ग आहेत. केवळ व्यापार आणि संस्कृतीच नव्हे, तर कुतूहल आणि साहसाचेही या मार्गाने आदानप्रदान झाले आहे. विविध देशांच्या जडणघडणीला यातून आकार मिळाला आणि मानवाचे भविष्यही याद्वारे लिहिले गेले. समुद्र हे खऱ्या अर्थाने विविध देशांमधील परस्पर आदानप्रदानाचे मापदंड राहिले आहेत."हिंदी महासागर क्षेत्रातील सागरी सुरक्षेसाठी केंद्र सरकारने 'माहिती संलयन केंद्र-हिंदी महासागर प्रदेश' (आयएफसी-आयओआर) याची स्थापना २०१८ मध्ये केली आहे. नौदलाकडे याचे यजमानपद आहे. या प्रदेशातील समन्वय चांगला व्हावा, माहितीचे आदानप्रदान अचूक व्हावे, यासाठी 'आयएफसी-आयओआर'मधील देशांतील संपर्क अधिकाऱ्यांचीही (आयएलओ) नियुक्ती करण्यात आली आहे. या परिषदेत विविध देशांतील ३० प्रतिनिधी उपस्थित होते. हा धागा पकडून ॲडमिरल त्रिपाठी यांनी हिंद-प्रशांत भागाचे भविष्य संवाद, सहकार्य आणि परस्परविश्वासाच्या माध्यमातून एकत्रितपणे घडविण्यासाठीची कटिबद्धता यातून दिसते, असे म्हटले.

तसेच, २०२८ पर्यंत 'आयएलओ'ची संख्या ५० पर्यंत वाढविण्याचेही त्यांनी प्रतिपादन केले.हिंद-प्रशांत प्रादेशिक संवाद-२०२५'मध्ये ते बोलत होते. माणेकशॉं केंद्रामध्ये २८ ते ३० ऑक्टोबरदरम्यान नौदलाच्या वतीने परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. नौदलातील विविध अधिकारी आणि विविध देशांतील या क्षेत्रांतील तज्ज्ञांनी परिषदेत सहभाग घेतला आहे.ॲडमिरल त्रिपाठी म्हणाले, "मानवजातीच्या इतिहासात सागरी मार्ग हे सर्वांत जुने महामार्ग आहेत.



### गतिमान आणि गुंतागुंतीचे आव्हान

केवळ व्यापार आणि संस्कृतीच नव्हे, तर कुतूहल आणि साहसाचेही या मार्गाने आदानप्रदान झाले आहे. विविध देशांच्या जडणघडणीला यातून आकार मिळाला आणि मानवाचे भविष्यही याद्वारे लिहिले गेले. समुद्र हे खऱ्या अर्थाने विविध देशांमधील परस्पर आदानप्रदानाचे मापदंड राहिले आहेत.'

# दारु प्यायल्यानंतर अक्षय कुमार काय करतो?

बॉलीवूडच्या सुपरस्टार्समध्ये खिलाडी कुमार म्हणजेच अक्षय कुमारचं नाव घेतलं जातं. तो त्याच्या फिटनेस आणि हेल्थच्या बाबतीत कायमच गंभीर असतो. त्यासाठी तो दारु काय चहा सुद्धा पित नाही. पण एकदा अक्षयने खुलासा केला होता की, वाईन प्यायल्यानंतरही त्याला नशा चढते. तेव्हा तो काय करतो याबाबत एक मजेदार किस्सा देखील त्याने या कार्यक्रमादरम्यान सांगितला आहे. अक्षयने सलमान खानच्या दस का दम या कार्यक्रमात हजेरी लावली होती. त्यावेळी त्याने याबाबत मजेशीर खुलासा केला आहे. यावेळी त्याने सांगितलं की, जेव्हा मला वाईन चढते तेव्हा मी जेवण बनवायला लागतो. अक्षयचा हाच व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतोय. यामध्ये अक्षय कुमारने सांगितलं आहे की, त्याला थोडी वाईन जरी प्यायली तरी त्याची नशा चढते. पण त्याला नशा चढल्यावर तो गात किंवा नाचत नाही, तर जेवण बनवून त्याच्या बायकोला ट्विंकल खन्नाला भरवतो. अक्षयच्या या उत्तरावर कार्यक्रमात एकच हशा पिकला. यावर बोलताना अक्षय कुमारनं म्हटलं की, मी थोडी जरी वाईन पिली तर ती मला चढते. नशेत लोकं खूप काही करतात. काही गातात, काही पडतात रागावतात पण मी जेवण बनवायला सुरुवात करतो. तेव्हा मी माझ्या लायकीवर येतो. खरतर अक्षय ॲक्टर बनण्याआधी शेफ होता. तो कॅनडामध्ये शेफ म्हणून काम देखील करत होता. अक्षयने सांगितलं की, मी फक्त कुकिंगच नाही करत तर ते मी बायकोला देखील भरवतो.

# पुष्पा 2 मधील लक्ष वेधणारा 'श्रीवल्ली'चा लूक



बॉक्स ऑफिसवर कोटींची कमाई केल्यानंतर पुष्पाचा सिक्वेल 'पुष्पा-2'प्रेक्षकांच्या भेटीला आला. या चित्रपटातील अल्लू अर्जुनने साकारलेल्या पुष्पा या व्यक्तिरेखेसोबत रश्मिकाने साकारलेल्या श्रीवल्ली ही व्यक्तीरेखाही प्रेक्षकांना भावली .चित्रपटातील 'श्रीवल्ली' या गाण्याने चांगलाच धुमाकूळ घातला.आता रश्मिका मंदानाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने 'पुष्पा -2' निर्मात्यांनी श्रीवल्लीचा पोस्टरमध्ये श्रीवल्लीने साडी नेसली असून, ज्वेलरी परिधान केली आहे. कपाळावर असलेल्या कुंकूने आणि गळ्यात असणाऱ्या डोरल्याने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. रश्मिकाच्या डोळ्यात काहीसा आक्रमकपणा आहे. लोकांचे हृदय चोरणारी श्रीवल्ली उर्फ रश्मिकाला वाढदिवसाच्या शुभेच्छा अशी कॅप्शन देण्यात आली आहे. चाहत्यांकडून रश्मिकाच्या या लूकवर कौतुकाचा वर्षाव सुरू आहे. एका युजरने श्रीवल्ली असे लिहित फायर इमोजी पोस्ट केली आहे. अनेक चाहत्यांनी हार्ट आणि फायर इमोजी पोस्ट करत आहेत. अल्पावधीतच लाखो लोकांनी या पोस्टला लाईक केले आहे.

# सुंदर गातात डॉ. नेने



अभिनेत्री माधुरी दीक्षित आणि तिचे पती डॉ. श्रीराम नेने बॉलीवूडमधील लोकप्रिय जोडपं. दोघेही सोशल मीडियावर खूप सक्रिय आहेत. ते व्हिडिओ व फोटो शेअर करत असतात. डॉ. नेनेंनी आता त्यांच्या एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यात ते दोघेही एड शीरनचं लोकप्रिय गाणं गाताना दिसत आहेत. डॉ. नेनेंनी इन्स्टाग्रामवर त्यांचा व माधुरीचा एक व्हिडिओ शेअर केला आहे. यात माधुरी एड शीरनचं 'परफेक्ट' गाणं गाताना दिसते. नंतर डॉ. नेनेही तिच्याबरोबर हे गाणं म्हणतात. 'आमच्या आवडत्या गाण्यांपैकी एक 'परफेक्ट' गाताना नेहमी खूप मजा येते' असं कॅप्शन डॉ. नेनेंनी या व्हिडिओला दिलं आहे. याचबरोबर त्यांनी एड शीरनला टॅगही केलं आहे.डॉ. नेने व माधुरीच्या या व्हिडीओवर चाहते लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. दोघांनी खूप छान गाणं गायलं, असं चाहते म्हणत आहेत. 'किती गोड,' 'माहित नव्हतं डॉ. नेने इतकं छान गातात', 'खूप छान', 'गाणं खूप आवडलं' अशा कमेंट्स या व्हिडीओवर आहेत.माधुरी दीक्षितच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास जानेवारीमध्ये तिचा मराठी सिनेमा 'पंचक' प्रदर्शित झाला होता. माधुरी व डॉ. नेने यांनी या चित्रपटाची निर्मिती केली होती. माधुरी सध्या 'डान्स दिवाने' चं परीक्षण करत आहे.

# नेत्रा करणार अस्तिकाचा शेवट

'सातव्या मुलीची सातवी मुलगी' ही मालिका सध्या रंजक वळणावर आहे. तसेच लवकरच या मालिकेत मोठी ट्रीस्ट पाहायला मिळणार आहे. कारण लवकरच त्रिनयना देवी अस्तिकाचा शेवट करणार आहे. अस्तिका विरोचकाने दिलेला काळा मणी तिच्याकडे असल्यामुळे सुरक्षित रहात होती. पण ही गोष्ट नेत्राला कळते आणि ती हीच गोष्ट अद्वैतला सांगते. त्याचवेळी रुपालीसुद्धा अस्तिकाला सांगते की अव्दैत-नेत्रा दोघे मिळून तुझा वध करण्याचा प्रयत्न करतील. सध्या मालिकेत अस्तिका ही नेत्रा म्हणून वावरत आहे. त्याचप्रमाणे ती नेत्राला त्रिनयना देवीच्या मूर्तीच्या जागी विरोचकाची मूर्ती आणण्याचं देखील आव्हान देते. पण नेत्रा मात्र अस्तिकाला जशासं तसं उत्तर देते. त्याचसाठी नेत्रा आणि अद्वैत मिळून अस्तिकाचा वध करण्याची योजना आखत असतात. घरातले सगळेजणही त्यांना साथ देतात. पण रुपाली अस्तिकाला सांगते की, ते तुला संपण्याआधीच तू अद्वैतचा जीव घे आणि नागरुपात येऊन खोलीत लपून रहा. दरम्यान रुपालीच्या सांगण्यामुळे अस्तिका पूर्णपणे गोंधळून जाते. काय करावं हेच तिला कळत नाही. त्यानंतर ती अद्वैतच्या प्रेमळ बोलण्यात अडकते. तरीही रूपाली अस्तिकाला अव्दैतच्या जाळ्यातून सोडवते आणि तिला सांगते, की अव्दैतला पुन्हा मारण्याचा प्रयत्न कर.नेत्रा विरोचकाची खेळी पूर्णपणे ओळखते आणि घरातल्या सर्वांना एकत्र रहा असं सांगते. त्यानंतर नेत्रा अस्तिकाचा वध करण्यासाठी काय मार्ग असू शकेल, यावर विचार करते.'सातव्या मुलीची सातवी मुलगी' मध्ये विरोचक आणि त्रिनयना देवीच्या मुलींमध्ये युद्ध होईल. या युद्धात विरोचकाचा शेवट झाल्यानंतर मालिकेचा शेवट होईल असेही त्यांनी सांगितले. विरोचक संपल्यानंतर मालिकेला काही अर्थच राहणार नाही, त्यामुळे मालिका संपू शकते असा अंदाज त्यांनी वर्तवला.

# लोकांना तो सीन खरंच आवडला नाही का?



ॲनिमल हा सिनेमा डिसेंबर महिन्यात प्रदर्शित झाला होता. बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई करणारा हा सिनेमा ठरला. या सिनेमात रश्मिका मंदाना, रणबीर कपूर, अनिल कपूर, बॉबी देओल आणि तृप्ती डिमरी मुख्य भूमिकांमध्ये आहेत. संदीप वांगा रेड्डीने हा सिनेमा दिग्दर्शित केला आहे. या सिनेमावरुन बरीच उलटसुलट चर्चा झाली. तसंच सिनेमाचा ट्रेलर जेव्हा प्रदर्शित झाला तेव्हा त्यातल्या एका संवादावरुन रश्मिका मंदानाला चांगलंच ट्रोल करावं लागलं. या ट्रोलिंगवर आता रश्मिकाने मौन सोडलं आहे. ट्रेलरमध्ये जो प्रसंग दाखवण्यात आला होता त्यात रश्मिका मंदाना करवा चौथच्या दिवशी रणबीरवर चांगलीच चिडलेली असते. तसंच रागाच्या भरात ती एक वाक्य बोलून जाते ज्यानंतर रणबीर चिडतो. जे वाक्य ती बोलत असते त्याचा काहीही संदर्भ लागला नसल्याने रश्मिका मंदानाला खूप ट्रोलिंगला सामोरं जावं लागलं. अगदी ती काय बोलते ते समजत नसल्यापासून ते तिने तोंडात सुपारी ठेवून संवाद म्हटला आहे का? इथपर्यंत अनेक प्रकारे तिला ट्रोल केलं गेलं. या सगळ्या प्रकारावर आता रश्मिकाने मौन सोडलं आहे. नेहा धुपियाच्या नो फिल्टर नेहा या टॉक शोमध्ये रश्मिका आली होती. त्या शोमध्येच तिने या मुद्द्यावर मौन सोडलं आहे."करवा चौथचा तो प्रसंग नऊ मिनिटांचा होता. तो सीन शूट करताना सेटवर जितके लोक होते त्या सगळ्यांना आवडला होता. नऊ मिनिटांचं ते शूट संपल्यावर सगळ्यांनीच टाळ्या वाजवल्या. तो सीन खूप चांगल्या प्रकारे शूट झाला असं सगळ्यांनीच सांगितलं. ट्रेलर जेव्हा प्रदर्शित झाला तेव्हा एका डायलॉगवरुन मला प्रचंड ट्रोल करण्यात आलं. तेव्हा मी असा विचार केला की नऊ मिनिटांचा तो इतका लांबलचक सीन सेटवरच्या लोकांना आवडला होता, मग आता लोक आपल्याला ट्रोल का करत आहेत? मी जणू काही स्वतःभोवती एखादा फुगा फुगवून घेतला होता का? लोकांना तो सीन खरंच आवडला नाही का? तुम्ही काय शूट केलं आहे ते लोकांना माहीत नसतं. त्यांनी १० सेकंदाचा तेवढा एक डायलॉग पाहिला आणि मला ट्रोल करायला सुरुवात केली." असं रश्मिकाने म्हटलं आहे. लोकांनी महिलेला तिच्या शरीरावरुन ट्रोल करणं, बॉडी शेमिंग ज्याला आपण म्हणतो ते मला मुळीच आवडत नाही. आता एखाद्या महिलेच्या शरीरावरुन तिला ट्रोल करता येत नसेल तर चित्रपट, त्यातला पेहराव, त्यातली भाषा, संवाद यावरुन ट्रोलिंग होतं. मी कसा परफॉर्मन्स दिला आहे हे मला माहीत आहे असं रश्मिका मंदानाने म्हटलं आहे.ॲनिमल हा सिनेमा डिसेंबर महिन्यात प्रदर्शित झाला होता. बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई करणारा हा सिनेमा ठरला. या सिनेमात रश्मिका मंदाना, रणबीर कपूर, अनिल कपूर, बॉबी देओल आणि तृप्ती डिमरी मुख्य भूमिकांमध्ये आहेत. संदीप वांगा रेड्डीने हा सिनेमा दिग्दर्शित केला आहे.

जालोलोव्हवर एकतर्फी विजय

कुस्तीत उझबेकिस्तानच्या जालोलोव्हवर विजय

# सुजीत कलकलची सुवर्णपदकावर मोहोर!

## तांत्रिक वर्चस्वावर १०-० अशी मात

।मुंबई।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**भारताच्या सुजीत कलकल याने युवा (२३ वर्षांखालील) जागतिक अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली. फ्री-स्टाइल विभागातील ६५ किलो वजनी गटाच्या अंतिम लढतीत सुजीतने उझबेकिस्तानच्या उमिदजोन जालोलोव्ह याच्यावर तांत्रिक वर्चस्वावर १०-० अशी मात केली.**



सुजीतने १० गुणांची कमाई करताच पंचांनी लढत थांबवत नियमानुसार त्याला विजयी घोषित केले. त्या वेळी लढतीची दोन मिनिटे शिल्लक होती. या वर्चस्वासह सुजीत गतवर्षीच्या स्पर्धेतील पदकाचा रंग बदलण्यात यशस्वी ठरला. गेल्या स्पर्धेत सुजीत कांस्यपदकाचा मानकरी ठरला होता. आता युवा आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारा तो अमन सेहरावत (२०२२) आणि चिराग चिकारा यांच्यानंतर तिसरा भारतीय कुस्तीपटू ठरला आहे.सुजीतने या वर्षीच्या स्पर्धेत प्रत्येक लढतीत आपले वर्चस्व राखले होते. पहिल्या दोन फेरीत त्याने अनुक्रमे मोल्डोवाचा फियोडोर सेव्दारी आणि पोलंडचा डॉमिनिक याकूब यांच्यावर तांत्रिक आघाडीवरच मात केली होती. उपांत्यपूर्व फेरीत ०-२ अशा पिछाडीनंतर त्याने बशीर मॅगोमेडोव्ह याचा ४-२ असा पराभव केला, मग उपांत्य फेरीत जपानच्या तगड्या युटो निशिऊची याच्यावर ३-२ अशी मात केली.या स्पर्धेत भारताच्या मुलींनी चमकदार कामगिरीसह दहापैकी सात वजनी गटांतून (दोन रौप्य, पाच कांस्य) पदकांची कमाई करून सर्वसाधारण विजेतेपदापर्यंत मजल मारली होती. मुलांना मात्र ग्रीको-रोमन आणि फ्री-स्टाइल अशा दोन विभागांतून केवळ एकाच सुवर्णपदकाची कमाई करता आली. फ्री-स्टाइल विभागात सुजीतचा अपवाद वगळता दोन कुस्तिगीर कांस्यपदकाच्या लढतीत खेळले, पण त्यांना अपयश आले. ग्रीको-रोमन प्रकारात भारताचे सर्व कुस्तिगीर पहिल्याच फेरीत पराभूत झाले. सुजीतचे हे पहिलेच जागतिक विजेतेपद ठरले. यापूर्वी त्याने २३ वर्षांखालील स्पर्धेत २०२२ आणि २०२५ मध्ये आशियाई विजेतेपद, तर २० वर्षांखालील स्पर्धेत २०२२ मध्येच आशियाई विजेतेपद मिळविले होते. भारतामध्ये फ्री-स्टाइल प्रकाराच्या ६५ किलो वजनी गटात अनेक वर्षे बजरंग पुनियाने पकड राखली होती. त्यामुळे सुजीतला आंतरराष्ट्रीय स्तरावरील संधीसाठी प्रतीक्षा करावी लागली. मात्र आता २०२८ ऑलिम्पिकच्या दृष्टीने त्याच्याकडे संभाव्य पदकविजेता म्हणून पाहिले जात आहे.सुजीतने १० गुणांची कमाई करताच पंचांनी लढत थांबवत नियमानुसार त्याला विजयी घोषित केले. त्या वेळी लढतीची दोन मिनिटे शिल्लक होती. या वर्चस्वासह सुजीत गतवर्षीच्या स्पर्धेतील पदकाचा रंग बदलण्यात यशस्वी ठरला. गेल्या स्पर्धेत सुजीत कांस्यपदकाचा मानकरी ठरला होता. आता युवा आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारा तो अमन सेहरावत (२०२२) आणि चिराग चिकारा यांच्यानंतर तिसरा भारतीय कुस्तीपटू ठरला आहे.सुजीतने या वर्षीच्या स्पर्धेत प्रत्येक लढतीत आपले वर्चस्व राखले होते. पहिल्या दोन फेरीत त्याने अनुक्रमे मोल्डोवाचा फियोडोर सेव्दारी आणि पोलंडचा डॉमिनिक याकूब यांच्यावर तांत्रिक आघाडीवरच मात केली होती. उपांत्यपूर्व फेरीत ०-२ अशा पिछाडीनंतर त्याने बशीर मॅगोमेडोव्ह याचा ४-२ असा पराभव केला, मग उपांत्य फेरीत जपानच्या तगड्या युटो निशिऊची याच्यावर ३-२ अशी मात केली.या स्पर्धेत भारताच्या मुलींनी चमकदार कामगिरीसह दहापैकी सात वजनी गटांतून (दोन रौप्य, पाच कांस्य) पदकांची कमाई करून सर्वसाधारण विजेतेपदापर्यंत मजल मारली होती. मुलांना मात्र ग्रीको-रोमन आणि फ्री-स्टाइल अशा दोन विभागांतून केवळ एकाच सुवर्णपदकाची कमाई करता आली. फ्री-स्टाइल विभागात सुजीतचा अपवाद वगळता दोन कुस्तिगीर कांस्यपदकाच्या लढतीत खेळले, पण त्यांना अपयश आले. ग्रीको-रोमन प्रकारात भारताचे सर्व कुस्तिगीर पहिल्याच फेरीत पराभूत झाले. सुजीतचे हे पहिलेच जागतिक विजेतेपद ठरले.

### ऑलिम्पिकसाठी दावेदार...

२०२५ मध्ये आशियाई विजेतेपद, तर २० वर्षांखालील स्पर्धेत २०२२ मध्येच आशियाई विजेतेपद मिळविले होते. भारतामध्ये फ्री-स्टाइल प्रकाराच्या ६५ किलो वजनी गटात अनेक वर्षे बजरंग पुनियाने पकड राखली होती. त्यामुळे सुजीतला आंतरराष्ट्रीय स्तरावरील संधीसाठी प्रतीक्षा करावी लागली. मात्र आता २०२८ ऑलिम्पिकच्या दृष्टीने त्याच्याकडे संभाव्य पदकविजेता म्हणून पाहिले जात आहे.

# 'पॉवरप्ले'मध्ये बुमराची भूमिका निर्णायक!

## ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या ट्वेन्टी-20 मालिकेबाबत सूर्यकुमारचे वक्तव्य

।नवी दिल्ली।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या ट्वेन्टी-२० मालिकेत 'पॉवरप्ले'चा टप्पा अत्यंत महत्त्वाचा असून यात तारांकित वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराची भूमिका निर्णायक ठरू शकते, असे मत भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने व्यक्त केले.**




भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या ट्वेन्टी-२० मालिकेला उद्या, बुधवारी प्रारंभ होईल. ऑस्ट्रेलियाचा संघ ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये अतिशय आक्रमक शैलीत खेळण्यासाठी ओळखला जातो. त्यांचा 'पॉवरप्ले'मध्ये अर्थात सुरुवातीच्या सहा षटकांत अधिकाधिक धावा करण्याचा प्रयत्न असतो. त्यामुळे त्यांना रोखायचे झाल्यास बुमराची कामगिरी निर्णायक ठरेल असे सूर्यकुमारला वाटते.आम्ही एकदिवसीय मालिका आणि त्याआधी ट्वेन्टी-२० विश्वचषकात ऑस्ट्रेलियाला खेळताना पाहिले आहे. त्यांच्याविरुद्ध 'पॉवरप्ले' अत्यंत महत्त्वाचा असतो. या टप्प्यात त्यांना रोखणे आव्हानात्मक ठरू शकते. मात्र, बुमराने अलीकडेच झालेल्या आशिया चषकात 'पॉवरप्ले'मध्ये किमान दोन षटके टाकत प्रतिस्पर्धी संघातील फलंदाजांवर अंकुश ठेवला होता.

तो इतकी जबाबदारी घेऊन खेळतो हे पाहून छान वाटते. सुरुवातीच्या षटकांत ऑस्ट्रेलियाला रोखणे सोपे नसेल, पण आम्ही प्रयत्न नक्कीच करू," असे सूर्यकुमारने सांगितले.बुमराला एकदिवसीय मालिकेसाठी विश्रांती देण्यात आली होती. आता तो ट्वेन्टी-२० मालिकेसाठी पूर्णपणे आमच्या सध्याच्या संघात बुमरालाच ऑस्ट्रेलियात खेळण्याचा सर्वाधिक अनुभव आहे.

### बुमरासारखा गोलंदाज महत्त्वाचा

त्यामुळे अन्य खेळाडू त्याच्याशी संवाद साधून बऱ्याच गोष्टी समजून घेत आहेत. तो सहकाऱ्यांना मदत करण्यास नेहमीच तयार असतो. ऑस्ट्रेलियाविरुद्ध त्यांच्या घरच्या मैदानांवर खेळताना बुमरासारखा गोलंदाज खूप महत्त्वाचा ठरतो. तो संघात असणे आम्हाला निश्चित फायदेशीर ठरेल," असे सूर्यकुमारने नमूद केले.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। बुधवार ।
। दि. 29 ऑक्टोबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## बिहारी बांधवांनी जल्लोषात साजरी केली छठ पूजा

# जेजुरीत जय गंगामय्या!

### सूर्याला अर्घ्य देत जयाद्रीखोऱ्यात गुंजला "जय गंगामय्या"चा नारा

। पुरंदर ।
विजयकुमार हरिश्चंद्रे : महाईन्यूज



**सह्याद्री खोऱ्यातील ऐतिहासिक जेजुरी नगरीत 'जय गंगामय्या, खंडोबा महाराज की जय' अशा गगनभेदी जयघोषात बिहारी बांधवांनी पारंपरिक उत्साहात छठ पूजा साजरी केली. संपूर्ण देशातील विविध राज्यांप्रमाणेच जेजुरीतील पेशवे तलाव, मल्हारसागर धरण, होळकर तलाव परिसरात शेकडो भाविकांनी सूर्यदेवतेची आराधना करून हा पवित्र उत्सव मोठ्या भक्तिभावाने पार पाडला.**

छठ पूजेच्या निमित्ताने महिलांचा सहभाग लक्षणीय होता. या विधीत स्त्रिया कठोर व्रत पाळत उपवास करतात. उगवत्या आणि मावळत्या सूर्याला अर्घ्य अर्पण करून सूर्यदेवतेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी परिसर स्वच्छ करून भाविकांनी पारंपरिक पद्धतीने पूजा मांडली, छठ पूजेची गाणी गात भक्तीभावाने सूर्यदेवतेचे स्मरण केले.

वैदिक परंपरेशी जोडलेला हा सण महाभारतातील उल्लेखांपर्यंत पोहोचतो. पांडव व द्रौपदी यांनी राज्य पुनर्प्राप्तीसाठी सूर्याची आराधना केल्याची आख्यायिका प्रचलित आहे. सूर्योपासनेतून मिळणारी ऊर्जा, मानसिक स्थैर्य व आरोग्यलाभ या सणामागील वैज्ञानिक दृष्टिकोनही भाविकांनी मांडला.

पूजेच्या साहित्यांत फळे, नारळ, ऊस, खजूर, केळी, गूळ व ठेकुआचा समावेश होता. कांदा, लसूण व मसाले यांचा वापर मात्र टाळण्यात आला. चौथ्या दिवशी उगवत्या सूर्याला अर्घ्य अर्पण करून व्रताची सांगता करण्यात आली व प्रसाद वाटपाने उत्सवाची सांगता झाली.

या प्रसंगी बिहार, उत्तर प्रदेश, कर्नाटक, आंध्रप्रदेश तसेच महाराष्ट्रातील कामानिमित्त येथे स्थायिक झालेले नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जेजुरी नगरीतील सामाजिक व राजकीय कार्यकर्ते जयदीप बारभाई, सचिन पेशवे, गणेश निकुडे, अलका शिंदे, गणेश भोसले, सचिन सोनवणे, संदीपअप्पा जगताप, रोहिदास कुंभार आदींनी छठ पूजेच्या निमित्ताने सर्व भाविकांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. संपूर्ण जयाद्रीखोऱ्यात सूर्याला अर्घ्य देत "जय गंगामय्या"चा नारा घुमला आणि भक्तिभाव, निसर्गपूजा व सामाजिक ऐक्याचा सुंदर संगम अनुभवास आला.

---

## एस. पी. जी. इंटरनॅशनल पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

### मेहनत, शिस्त आणि चिकाटीच्या बळावर नव्या, उत्कर्ष आणि स्वरा यांचे कराटेत यश

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**एस. पी. जी. इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, भोसरी येथील विद्यार्थ्यांनी कराटे क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवत शाळेचा आणि संस्थेचा मान उंचावला आहे. शाळेतील नव्या बागुल (इयत्ता ३ री), उत्कर्ष उबाळे (इयत्ता ६वी) आणि स्वरा पानसरे (इयत्ता ७वी) या विद्यार्थ्यांनी अलीकडेच झालेल्या कराटे परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करत ब्लॅक बेल्ट मिळवला आहे.**







या यशामुळे महेश दादा स्पोर्ट फाउंडेशनचा अभिमान अधिक वाढला आहे. अनेक वर्षांच्या कठोर मेहनती, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि चिकाटीच्या जोरावर या विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले आहे. या कामगिरीबद्दल फाउंडेशनचे प्रशिक्षक श्री. गणेश लांडगे सर, शाळेचे सर्व शिक्षकवर्ग तसेच पालकवर्ग यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच भविष्यात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरही यश मिळवावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या आहेत. या तिन्ही विद्यार्थ्यांच्या यशामुळे शाळा परिसरात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.




**Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!**

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS
THROUGH LEARNING
Admission
Open
FOR 2026 – 27
Nursery – Std X
• CBSE Curriculum
• Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
• Digital Classrooms with AV Facilities
• Skill Development Programs including:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
• Focus on Holistic Development
Enroll Now!
Sunday Open: From 10 AM to 1 PM
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046